SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY

Advertisement

No.SGBAU/1/105/ 2-1457/2019 Date : 30 Dec.,2019

Applications are invited for **Chairperson of the Chair in the name of Sant Gadge Baba established in the University** on or before the **Last date 31 January, 2020.**

Details of eligibility, honorarium, other terms & conditions are available on the university website www.sgbau.ac.in.

Sd/-
Registrar
Sant Gadge Baba Amravati University

SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY
ADVERTISEMENT

No. SGBAU/1/105/2-1457/2019 Date : 30th December, 2019

Applications are invited for the post of Chairperson of the Chair (Professorship) established in the Sant Gadge Baba Amravati University in the name of Sant Gadge Baba, from the persons who have complete faith in Gadge Baba's ideology and have devotion for social work and have a credible contribution in the field, and are willing to undertake various activities such as dessimination of thoughts of Sant Gadge Baba, social work and research work on the thoughts and teaching of Sant Gadge Baba.

Tenure : The person to be appointed as Chairperson shall be appointed for a period of five years or till the age of 65 years whichever is earlier. The Person shall be eligible for extension upto age of 70 years in special circumstances as per provisions of Regulation 6/2018.

Honorarium : The Chairperson shall be paid as honorarium of Rs. 6,000/- per month.

The willing persons should submit their application on plain paper alongwith necessary supporting documents/testimonials duly attested, on or before 31.01.2020 to the undersigned. The postal delay shall not be entertained.

The above advertisement alongwith other details under Regulation 6/2018 is also available on the University website www.sgbau.ac.in

(Dr. Tushar Deshmukh)
Registrar
Sant Gadge Baba
Amravati University

Copy for information and necessary action:-

1) Finance & Accounts Officer, Sant Gadge Baba Amravati University, Amravati.
2) Dy.Registrar, (Devp), Sant Gadge Baba Amravati University, Amravati.
3) Incharge Chairperson, Sant Gadge Baba Adhyasan, Sant Gadge Baba Amravati University, Amravati.
4) All Heads of Teaching & Administrative Departments, Sant Gadge Baba Amravati University, Amravati.

Dy. Registrar (Estt.)
Sant Gadge Baba
Amravati University

F : Advertisement.docx

SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART ONE

गुरुवार, दिनांक २७ सप्टेंबर, २०१८

विनियम क्र. ६/२०१८

संत गाडगे वावा अमरावती विद्यापीठाअंतर्गत असलेल्या विविध अध्यासनाच्या व अभ्यास केंद्रांच्या प्रशासकीय कार्यपध्दती संदर्भातील विनियम, २०१८

ज्याअर्थी विद्यापीठ अनुदान आयोगाकडून / केंद्र शासन / राज्य शासनाकडून मंजूर झालेली विविध अध्यासने व अभ्यास केंद्रे विद्यापीठामध्ये कार्यरत आहेत व पुढे मंजूर होणार आहेत, त्याअर्थी सदर अध्यासनांच्या व अभ्यास केंद्रांच्या प्रशासकीय कार्यपध्दती संदर्भातील विनियम तयार करण्याचे व्यवस्थापन परिषदेने ठरविले आहे.

१) हे विनियम **"संत गाडगे वावा अमरावती विद्यापीठाअंतर्गत असलेल्या विविध अध्यासनाच्या व अभ्यास केंद्राच्या प्रशासकीय कार्यपध्दती संदर्भातील विनियम, २०१८"** म्हणून संबोधण्यात येतील.

२) हे विनियम व्यवस्थापन परिषदेने मंजूर केलेल्या तारखेपासून अस्तित्वात येतील.

व्याख्या

सदर विनियमामध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर

१) "विद्यापीठ" म्हणजे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अन्वये अस्तित्वात असलेले संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

२) "अध्यासन प्रमुख" म्हणजे विद्यापीठाने नियुक्त केलेले अध्यासन प्रमुख.

३) "शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी" म्हणजे नियमानुसार संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या सक्षम प्राधिकारीणीने / अधिका-याने नियुक्त केलेले व सेवेत स्थायी असलेले शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी.

१) **अध्यासन प्रमुख पदी नियुक्तीची कार्यवाही.**

अध्यासन प्रमुख पदी अर्ज मागविण्याकरिता स्थानिक वर्तमानपत्रामध्ये संक्षिप्त जाहिरात देण्यात यावी व त्यासंबंधी सविस्तार जाहिरात विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी. अध्यासन प्रमुख पदासाठी आलेल्या अर्जांची छाननी करून पात्र व्यक्तींना मुलाखतीसाठी निवड समितीपुढे निमंत्रित करावे किंवा निवड समिती स्वतः अशा तज्ज्ञ / कार्यक्षम व्यक्तीस संयुक्तिक कारणे नमूद करून आमंत्रित करू शकेल. निवड समितीने नेमणुकीबाबत व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करावी.

२) **अध्यासन प्रमुख पदांच्या नियुक्तीसाठी निवड समिती संरचना.**

अध्यासनांवर अध्यासन प्रमुख पदाच्या नेमणुकीसंदर्भात व्यवस्थापन परिषदेला शिफारस करण्याकरिता स्वतंत्रपणे निवड समिती राहील आणि निवड समितीची संरचना खालीलप्रमाणे असेल.

१) मा. कुलगुरू ... अध्यक्ष
२) मा. कुलपतींनी नामित केलेले व्यवस्थापन परिषदेचे सदस्य
३) व्यवस्थापन परिषदेव्दारे नामित व्यवस्थापन परिषदेचे दोन सदस्य
४) अध्यासनाशी संबंधित असलेल्या विषयाचे कुलगुरूंनी नामित केलेले एक विषय तज्ज्ञ
५) संबंधित देणगीदाराचे प्रतिनिधी (जर तसा करार केला असेल तर)
६) मा. कुलगुरू नामित केलेला एक अधिष्ठाता
७) कुलसचिव ... सदस्य-सचिव

निवड समितीच्या शिफारशीनुसार अध्यासन प्रमुख पदी नियुक्ती करण्याचे अधिकार व्यवस्थापन परिषदेला राहतील. यासंदर्भातील अध्यासन प्रमुख पदाच्या नियुक्तीसंदर्भात प्रशासकीय कार्यवाही आस्थापना शाखेकडून करण्यात येईल.

३) **अध्यासन प्रमुख पदी नियुक्तीचा कार्यकाळ**

अध्यासन प्रमुख पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीचा कार्यकाळ पाच वर्षाचा राहील. अध्यासन प्रमुख पदाच्या कार्यकाळाची वयोमर्यादा वयाची जास्तीत जास्त ६५ वर्षे इतकी राहील. तथापि, अध्यासन प्रमुख पदाची मुदत विशिष्ट परिस्थितीमध्ये वयाच्या ६५ वर्षानंतर ७० वर्षापर्यंतच्या कार्यकाळासाठी वाढवावयाची असल्यास त्या संबंधीचा निर्णय घेण्याचा अधिकार व्यवस्थापन परिषदेचा राहील.

४) अध्यासन-प्रमुख अध्यासनामध्ये रूजू झाल्यानंतर त्यांनी दरवर्षी त्यांच्या पुढील एक वर्षाच्या कामकाजासंदर्भातील संपूर्ण कृती आराखडा (Action Plan) तयार करून तो कुलगुरूंकडे माहितीस्तव सादर करणे आवश्यक राहील.

५) अध्यासन प्रमुख पुढील वर्षातील कार्यक्रमाचे पूर्वनियोजन करून, त्यासाठी लागणारी आर्थिक तरतूद विद्यापीठाच्या अर्थसंकल्पामध्ये करून घेतील.

६) अध्यासनासंदर्भातील कार्यक्रम, संशोधन, प्रकाशन इ. संदर्भातील दर ६ महिन्याचे अहवाल अध्यासन प्रमुख कुलगुरू यांना सादर करतील. तसेच दरवर्षी सर्व अध्यासन व अभ्यास केंद्राचे प्रमुख यांची कमीत कमी एक संयुक्त सभा प्रत्येक वर्षाच्या जानेवारी महिन्यात कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात येईल.

७) प्रत्येक अध्यासन प्रमुख संबंधित घटकांशी चर्चा करून अध्यासनाच्या कार्याविषयी माहितीपुस्तिका तयार करतील. तसेच अध्यासनाचे कार्य समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचेल अशी व्यवस्था करतील (पुरेसा निधी उपलब्ध असल्यास).

८) अध्यासन प्रमुख आठवड्यातून किमान तीन दिवस अध्यासनाचे कार्य करतील.

९) अध्यासन प्रमुखांना द्यावयाच्या मानधनाबाबत व्यवस्थापन परिषद निर्णय घेईल व तो अंतिम राहील.

१०) विद्यापीठ शैक्षणिक विभागामध्ये कर्तव्यस्थ असणा-या शिक्षकांस अध्यासनाची जबाबदारी सोपविण्यात येवू नये किंवा अध्यासन प्रमुख पदावर नेमू नये. तथापि, अध्यासन प्रमुख यांची नियमित नियुक्ती होईपर्यंत त्यांना कार्यभार देण्यात यावा.

११) अध्यासनांच्या संदर्भ ग्रंथासाठी / पुस्तकांसाठी स्वतंत्र वेगळा कक्ष असावा.

१२) अध्यासन केंद्रातील प्रशासकीय कामकाज सुचारू पध्दतीने होण्याकरिता मा. कुलसचिव, विद्यापीठ आस्थापनेतील एक सहाय्यक कुलसचिव व संगणकाचे ज्ञान असणा-या एका लिपीकावर जबाबदारी सोपवतील तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने योजनेअंतर्गत मंजूर केलेल्या विविध अभ्यास केंद्रामध्ये भाडे तत्वावर (Hiring Services) नियुक्त केलेल्या सर्व व्यक्ती अध्यासने व अभ्यास केंद्र यांचे एकत्रितरित्या प्रशासकीय कार्य सांभाळतील.

१३) अध्यासने आणि विद्यापीठातील विभाग हे कामकाजाच्या दृष्टीने वेगळे असावेत.

१४) अभ्यास केंद्रांच्या समन्वयकांची नियुक्ती मा. कुलगुरू करतील. तसेच अध्यासन व अभ्यास केंद्रांचे काम थेट मा. कुलगुरूंच्या नियंत्रणाखाली राहील.

१५) वरिल विनियमात काहीही नमूद असले तरी शासनाकडून किंवा विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मंजूर झालेल्या अध्यासनाचे किंवा अभ्यास केंद्राचे कार्य शासन निर्णय किंवा विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे चालेल.

*****